# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुं.क. सोसायटी
## राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद

**कंत्राटी पध्दतीने खालील नमूद कंत्राटी सेवेकरीता अर्ज मागवीण्यात येत आहे**

**WALK IN INTERVIEW**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद स्तरावरील विविध कार्यक्रमांतर्गत कंत्राटी सेवा घ्यावयाची आहे. सदरील सेवा दि.३१/०३/२०२३ पर्यंत कंत्राटी तत्वावर उपलब्ध करायची असुन सामाजिक आरक्षणानुसार http://www.zpaurangabad.gov.in/,https://arogya.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. जाहिराती मध्ये अपेक्षीत शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अटी व शर्ती नमूद करुन सविस्तर जाहिरात प्रकाशित करण्यात आलेली आहे. इच्छुक उमेदवारांनी सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना प्राप्त करुन घेवून विहित शुल्कासहीत संपुर्ण भरलेले अर्ज दिनांकः२६/०८/२०२२ रोजी निम्न उल्लेखीत सेवांसाठी परिपुर्ण भरलेल्या अर्जासहित शैक्षणिक पात्रतेच्या छायांकित प्रती व डीडी सोबत आपले अर्ज सकाळी. १०:०० ते १२:०० या वेळेत

अ.क्र.१ ते ६ या कंत्राटी सेवेचे परिपुर्ण भरलेले अर्ज जिल्हा रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद येथील कक्ष क्र.५९ मधील आयपीएचएस कक्ष येथे देण्यात यावे.

तसेच अ.क्र.७ ते १० या कंत्राटी सेवेचे परिपूर्ण भरलेले अर्ज रुग्णालयातील कक्ष क्र. ५९ मध्येच एन.सी.डी. या कक्षामध्ये देण्यात यावे..

**सदर प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार आहे. कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेण्याच्या प्रक्रिये दरम्यान काही अनधिकृत व्यक्तीकडून त्यांचे मार्फत कंत्राटी सेवा मिळवून दिली जाईल असे कथन करुन उमेदवारांची फसवणूक होण्याची शक्यता असते हे विचारात घेता सावध रहावे. सदर प्रक्रिये दरम्यान कोणाकडून पैशांची मागणी झाल्यास अथवा वशिलेबाजी करावयाचा प्रयत्न झाल्यास तात्काळ आपल्या नजिकच्या पोलीस स्टेशन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना कळवावे.**

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,
जिल्हा परिषद,औरंगाबाद.

जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,,औरंगाबाद.

राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी,
**आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद**

**प्रति,**
.....................................................
.....................................................
.....................................................

उमेदवाराचा फोटो येथे चिटकवावा

## अर्जाचा नमुना

अर्ज केलेल्या पदाचे नांव :————————————

अर्जदाराचे नांव : ————————————

अर्जदाराचे वडिलांचे संपुर्ण नांव : ————————————

जन्म तारीख. ———————— (जाहिरात प्रसिध्द तारखेस वय):
वर्ष ———— महिना ———— दिवस ————

अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ————————————
————————————————————————

दूरध्वनी क्रमांक :———————— Email id ----------------------------------------

अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय / नाही

जातीचा प्रवर्ग :- ———— जात:- ————

अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय / नाही

अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ————

यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्याचा अनुभव आहे काय :- होय / नाही

असल्यास ठिकाण ————————————(वर्ष........ महिना.........दिवस.......)

- राष्ट्रीयकृत बॅंकेचे नाव व शाखा.................................. धनाकर्ष क्रमांक ...................
  धनाकर्ष रक्कम .................... धनाकर्ष दिनांक. ............................

अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे / नाही

**शैक्षणिक माहिती :-**

| अ.क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

**इतर शैक्षणिक अर्हता** :- संगणक, टायपिंग व इतर

| अ.क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |

**अनुभव** :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयांचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | शासकिय व निमशासकिय | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.(सर्व कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)........................... २)......................... ३).........................

४)................................ ५)........................... ६).............................

७)................................ ८)........................... ९).............................

१०)................................ ११).............................. १२).............................

वर नमूद केलेल्या तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास कंत्राटी सेवा गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतेही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन त्या मला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण :-

उमेदवाराची स्वाक्षरी

# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुं.क. सोसायटी,

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद

### कंत्राटी पध्दतीने खालील नमूद कंत्राटी सेवेकरीता अर्ज मागवीण्यात येत आहे

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद स्तरावरील विविध कार्यक्रमांतर्गत कंत्राटी तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा उपलब्ध करायची आहे. त्यानुसार खालील सेवांसाठी इच्छुक उमेदवारांनी निम्न उल्लेखीत सेवांसाठी परिपुर्ण भरलेल्या अर्जासहित शैक्षणिक पात्रतेच्या छायांकित प्रती व डीडी सोबत आपले अर्ज प्रत्यक्ष मुलाखत दिनांक २६/०८/२०२२ रोजी सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेत अ.क्र.१ ते ६ या संवर्गातील पदांचे अर्ज जिल्हा रुग्णालय,चिकलठाणा,औरंगाबाद येथील **आय.पी.एच.एस. कक्ष** व अ.क्र.७ ते १० या संवर्गातील पदांचे अर्ज **एन.सी.डी. कक्ष** क्र.५९ मध्ये समक्ष सादर करावेत.

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | कंत्राटी सेवा घ्यावयाची पदे | सामाजिक आरक्षणानुसार रिक्तपदांचा तपशील | अनुभव | मासिक एकत्रित मानधन | कंत्राटी सेवा घ्यावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | Physician (IPHS /NPHCE) | MD Medicine/DNB | ०२ | SC-1 VJ-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | जिल्हा रुग्णालय औरंगाबाद (NPHCE), उपजिल्हा रुग्णालय,वैजापुर ( IPHS) |
| 2 | SURGEON (IPHS) | MS General Surgery /DNB with MS-CIT कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक | ०१ | OPEN-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | उपजिल्हा रुग्णालय,वैजापुर |
| 3 | Anaesthestists (IPHS) | MD Anaesthesia /DA/DNB कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक | ०३ | SC-1 OBC 1 OPEN-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | उपजिल्हा रुग्णालय,सिल्लोड, ग्रामीण रुग्णालय,पाचोड, ग्रामीण रुग्णालय,कन्नड |
| 4 | Pediatrician (IPHS) | MD Ped /DON / DNB with MS-CIT कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक | ०१ | SC-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | ग्रामीण रुग्णालय.सोयगाव |
| 5 | Specialist IPHS (Obstetrician/Gynaecologists ) | MD/MS-DGO/DNB with MS-CIT कॉन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक | ०१ | OPEN-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | ग्रामीण रुग्णालय.सोयगाव |
| 6 | Radiologist (IPHS) | MD Radiologist / DMRD | ०१ | OPEN-01 | 1Yr. Exp. (Gov / NHM) | रु.७५,०००/- | उपजिल्हा रुग्णालय,वैजापुर |
| 7 | Psychiatrists (NMHP) | MD Psychiatrist/ DPM/DNB | ०१ | OPEN-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.७५,०००/- | जिल्हा रुग्णालय औरंगाबाद |
| 8 | Instructor for Hearing Impaired Children (NPPCD) | Relevant bachelorate degree With MSCIT | ०१ | OPEN-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.२५,०००/- | जिल्हा रुग्णालय औरंगाबाद |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | Dental Hygienist (NOHP) | 10+2 Science Dental Hygienist Course from a Govt.recognized Institute (नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक) | ०१ | SC-1 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु. १७,०००/- | उपजिल्हा रुग्णालय सिल्लोड |
| 10 | Medical officer E-Sanjivani-3 / Hematology-2 | MBBS (Full Time) with MS-CIT ,कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक . | ०५ | SC-1 OBC-1 EWS-1 OPEN-2 | 1Yr. Exp. (Gov./NHM) | रु.६०,०००/- | जिल्हा रुग्णालय औरंगाबाद |
| Total | | | १७ | | | | |

## (मार्गदर्शक सूचना)

राष्ट्रीय आरोग्य अभियांन अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजुर पदांपैकी कंत्राटी सेवा घ्यावयाकरीता जाहिरात **www.zpaurangabad.gov.In** या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना / माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.सर्व सुचनांचे काळजी पूर्वक वाचन करुन अर्ज विहित केलेल्या पध्दती नुसारच अर्ज सादर करावा अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखती दरम्यान सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल, व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असे होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्याण कोणत्याही वेळी किंवा उमेदवारांच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी / निवड तात्काळ रदद् करण्यात येईल.

**क) अर्ज करण्याच्या अनुषंगाने सुचनाः -**

१) सर्व उमेदवारांनी जाहिरातीत नमूद अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

२) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येइल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३) सोबत जोडलेला अर्जसोबत शैक्षणिक पात्रतेच्या छायांकित प्रती तसेच ज्या प्रर्वगात अर्ज केले आहे त्या प्रर्वगाचे जात प्रमाणपत्र, अनुभव असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र व धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कागदपत्र जोडु नयेत.

४) एका पदाकरीता एकच अर्ज भरणे आवश्यक आहे. एका पेक्षा अधिक पदांकरीता स्वतंत्र अर्ज भरणे आवश्यक आहे तसेच प्रत्येक पदांकरीता अर्ज शुल्कांचा स्वतंत्र धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

**ख) वयोमर्यादा -**

१) अर्ज सादर करण्याचा दिनांक म्हणजेच दि.२६/०८/२०२२ रोजी जाहीरातीच्या दिवशी वैद्यकीय अधिकारी व विशेषतज्ञ या कंत्राटी सेवेकरीता कमाल वयोमर्यादा व सेवा समाप्तीचे वय ७० वर्ष राहील. नर्सिंग व पॅरामेडीकल स्टाफ सेवेकरीता कमाल वय व सेवा समाप्ती ६५ वर्ष राहील. तसेच शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील,त्यानंतरच सेवा सुरु करण्याबाबतचे आदेश देण्यात येईल. इतर सेवाकरिता खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष कमाल वर्यामर्यादा राहील.राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये कार्यरत असल्यास ५ वर्ष वयाची अट शिथिल राहील.

**ग) अटी व शर्ती :-**

१) सदर सेवा ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून **दि.३१/३/२०२३** पर्यतच घेतली जाईल, तसेच केंद्र शासनाने नामंजूर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसीक दृष्टया सक्षम असावा, तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

३) वरील तक्त्यातील कंत्राटी सेवेकरीता निवड प्रक्रीया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार आवश्यकते प्रमाणे एका जागेसाठी पाच या पध्दतीचा अवलंब करुन कौशल्य चाचणी व तोंडी मुलाखत घेऊन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती http://www.zpaurangabad.gov.in, या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांशी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.

४) अर्जदाराने एका पेक्षा जास्त सेवा अर्ज करायचा असल्यास स्वतंत्र अर्ज करावा व अर्जासोबत जोडण्यात आलेल्या डिमांड ड्राप्ट (**Demand Draft**) धनाकर्षाची रक्कम परत केली जाणार नाही, या अटीवर उमेदवाराने अर्ज करावा.

**घ) अर्जदाराने A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर अर्ज करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अतंर्भुत असाव्यात:-**

१) अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे नांव, कंत्राटी सेवेचे नांव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, Email id, जन्मतारीख, शैक्षणीक अर्हतेचे सर्व तपशील - अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, बोर्ड / विद्यापीठाचे नांव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव - काम केलेल्या शासकीय / निमशासकीय संस्था / रुग्णालयाचे नांव, ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नांव, कालावधी,पदाची जबाबदारी व मानधन / वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२) अर्जासोबत स्वसांक्षाकित असलेले एस.एस.सी.,एच.एस.सी.गुणपत्रिका व प्रमाणपत्र, शाळा सोडण्याचा दाखला, पदवी गुणपत्रीका व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका व प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, आधार कार्ड/मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आकाराचे १ फोटो, जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

३) वैद्यकिय अधिकारी, विशेषतज्ञांनी व इतर तांत्रीक कंत्राटी सेवेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबधीत कौन्सिलकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र व अद्यावत पुर्ननोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) याप्रमाणे अर्जासोबत सर्व स्वसाक्षांकित प्रमाणपत्रे जोडून तक्त्यामध्ये नमुद असलेल्या सेवेच्या नावासमोरील नमुद कार्यालयाच्या ठिकाणी मा.अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांचे नावाने सादर करावा.

५) सदर सेवा कंत्राटी पध्दतीने घ्यायची असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही. आवश्यकतेप्रमाणे लेखी परीक्षा/मुलाखतीकरीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता मिळणार नाही.

६) विशेषतज्ञ/कर्मचारी या सेवा करीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त विशेषतज्ञ/अधिकारी अर्ज करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्ती झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेशंन) निवृत्ती ओळखपत्र याबाबतची संपुर्ण माहिति अर्जामध्ये नमुद करावी.

७) ज्या सेवानिवृत्त विशेषतज्ञ / कर्मचाऱ्यांची निवड होईल त्या कर्मचाऱ्यांचे मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८) जे सेवानिवृत्त विशेषतज्ञ / कर्मचारी हे प्रत्यक्ष मुलाखत व कौशल्य चाचणी मध्ये पात्र ठरतील त्यांची निवड करुन सदर विशेषतज्ञांचे त्यांचे सेवाकाळामध्ये अथवा सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही प्रकारची चौकशी अथवा प्रकरणे प्रलंबीत नसल्याबाबतचा ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरीता मा.संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाले नंतर निवड आदेश निर्गमीत करण्यात येईल.

९) आवश्यक जात आरक्षण प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णयानुसार इतर आरक्षीत /खुल्या प्रवर्गातून उपलब्ध झालेल्या उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१०) ज्या उमेदवारांनी या अगोदर कोणत्याही सेवे करीता अर्ज सादर केलेले असतील, तर ते सर्व अर्ज रद्द केले आहेत याची नोंद घ्यावी. जाहिरात प्रसिध्द दिनांकानंतर विहीत मुदतीत नव्याने अर्ज करणे बंधनकारक राहील.

११) शासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२) सदर रिक्त कंत्राटी सेवेच्या संख्येत व मानधनात तसेच पदस्थापनेच्या ठिकाणी बदल होऊ शकतो.

**ङ) शैक्षणिक आर्हता / पात्रता :-**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचुक तपशील नोंद करावा.

२) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

३) शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवयश्यक आहे. (निकाल घोषित झालेली तारीख)

४) अर्ज भरत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमूद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजुर करण्यात येतील.

५) अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमूद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुण ते संबंधित संस्थेकडुन प्रमाणित करुन घ्यावे. मुलाखतीच्या वेळी ती सादर करावी.

६) उमेदवारांची अर्जामध्ये नमूद माहिती नुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

७) उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हते बाबतची सर्व मुळ प्रमाणपत्र व कागदपत्रे मुलाखतीच्या वळी एक प्रत या कर्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.

८) उमेदवारांनी मुलाखतीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

९) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता / पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त विदयापीठातून प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

ध) अनुभव-

१) शैक्षणिक आर्हता व आवश्यक अतिरीक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवांची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२) अनुभवाचा तपशील नमूद करतांना पहिली नियुक्तीचा कालावधी ते सध्याचा नियुक्ती कालावधी क्रमानेच दयावा.

३) अनुभवाचा तपशील नमूद करीत असतांना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे. अशाच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमूद कारवा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

४) अनुभवाचा तपशील नमूद करताना रुजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी.यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

५) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरीक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**च) संगणक अर्हता व इतर -**

१) **MS-CIT** प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

**छ) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र -**

१) शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

२) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र मुलाखतीस पात्र उमेदवाराने मुलाखती दरम्यान सादर करणे अनिवार्य आहे.

**ज) अर्ज शुल्क -**

१) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.२००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१००/-रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राप्ट) अर्ज शुल्क असेल. धनाकर्ष पुढील नावे काढावा.

**"STATUTORY DEDUCTION NHM DIST INT HEALTH"**

२) योग्य धनाकर्ष शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) एका पेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करीत असल्यास प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र धनाकर्ष जोडावा.

**झ) निवड प्रक्रिया-**

१) सदर पदभरतीच्या अनुपंगाने प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या संख्येनुसार निवड प्रक्रिया केवळ गुणांकन मुलाखतीद्वारे किंवा लेखी व मुलाखतीद्वारे ठरविण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिपद, औरंगाबाद. यांच्याकडे राखुन ठेवले आहेत.

२) अर्जाच्या संख्येनुसार उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यावावत निर्णय घेण्यात येईल.

३) लेखी परीक्षा घ्यावयाची झाल्यास त्यावावत संवंधित सुचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

४) मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी. यांच्या मान्यतेने निकप लावून१:३ ते १:५ उमेदवारांची निवड मुलाखतीसाठी करण्यात येईल. मुलाखतीने उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त शैक्षणीक अर्हता, अनुभव आणि आवश्यकतेनुसार मुलाखत घेऊन खालील तक्त्यानुसार गुणांकन करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | पदाकरीता आवश्यक किमान अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात ५० गुण |
| आ | पदाकरीता आवश्यक अतिरिक्त अर्हता / पदव्युत्तर अर्हता | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात १० गुण |
| इ | पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षाकरीता ४ गुण (कमाल २० गुण) |
| ई | मुलाखत | २० गुण |

५) कोविड-१९ साथीच्या परिस्थितीमुळे मुलाखती/ लेखी परीक्षा घेणे शक्य नसल्यास शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

६) उपरोक्त निवड प्रक्रिये संदर्भात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, औरंगाबाद. यांचेकडे राहतील,त्यामुळे उपरोक्त नमुद निवड प्रक्रियेत परिस्थिती अनुरुप बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ट) सर्वसाधारण सुचना :-**

१) सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती आरोग्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.या करीता उमेदवारांनी www.zpaurangabad.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२) जहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याच्या संभव आहे.

३) जाहीरातीत नमुद केलेली पदे ही पुर्णतःकंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाने मंजुर केलेली नियमित अशी पदे नाहीत. सदर कंत्राटी सेवेचा राज्य शासनाच्या कोणत्याही पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनाच्या अन्य नियमित पदावर किंवा रिक्त अशी कोणत्याही प्रकारे राज्य शासन सेवेत समावुन घेण्याबाबतची मागणी करु शकणार नाही व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय इतर लाभाची मागणी करु शकणार नाही.

४) जाहीरातीत नमुद केलेली पदाचे मानधन हे एकत्रित मानधन आहे.

५) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रदद् करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, औरंगाबाद, यांनी राखून ठेवले आहेत.

**मुख्य कार्यकारी, अधिकारी,**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद.**

11.8.22

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी..........................................................................

श्री...........................................................................यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी

वय...............वर्ष, राहणार..........................................................................

याव्दारे असे जाहिर करतो/करते की,

१) मी............................................ या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ..................(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैंकी दि.२३/०७/२०२१ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या............................ आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३) दि.२३/०७/२०२१ रोजी हया असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि.२३/०७/२०२१ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**सही**